महाराष्ट्र शासन
इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,नागपुर
सेंट्रलएव्हेन्युरोड,रेल्वेस्टेशनजवळ,नागपुर -४४००१८
कार्यालयदुरध्वनीक्रमांक ०७१२-२८२०२००
फॅक्सक्रमांक ०७१२-२७८०२८
ईमेलआयडीक्रमांक -: igmcn@rediffmail.com
वेबसाईट -: igmc.org
जा.व.क्रमांक.इंगांशावैम/आस्था १व२/जाहिरात/ 5484 /२०२४ दिनांक 16 / ०८/२०२४

-: जाहिरात :-

विषय -: वैद्यकीय शिक्षण व संशोधन,मुंबई यांच्या अधिपत्याखालील इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,नागपूर येथील चिकित्सालयीन विषयातील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक या संवर्गातील रिक्त पदेमध्यवर्ती निवड प्रकियेमार्फत करार तत्वावर तात्पुरत्या नियुक्तीने भरण्याबाबत.

संदर्भ -: १) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग शासन निर्णय क्र. एलईसी-२०२१/प्र.क्र.१९९/वैसेवा-३,दिनांक ०९.०२.२०२२

२) आयुक्त,वैद्यकीय शिक्षण व संशोधन,मुंबई यांचे पत्र क्र. सवैशिवसं/जाहिरात/करार/क१/२५९३/२०२३ दिनांक २५.०८.२०२३

संचालनालय,वैद्यकीय शिक्षण व संशोधन,मुंबई यांच्या अधिपत्या खालील इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,नागपूर या आस्थपनेवरील चिकित्सालयीन विषयातील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक या संवर्गातील रिक्त असलेली पदे संचालनालयाच्या स्तरावरुन करार तत्वावर ३६४ दिवसांकरीता तात्पुरत्या नियुक्तीने भरण्याकरीता इच्छूक पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन अर्जमागविण्यात येत आहेत. इच्छुक पात्र उमेदवारांकडून मागविण्यात येत असलेले अर्ज संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या www.med-edu.inयासंकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांका पासून ते दिनांक २०.०८.२०२४ रोजी सायकाळी ०६.०० वाजेपर्यंत (शासकीय सुटटी वगळून ) अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्विकारले जातील. उमेदवाराने शैक्षणिक अर्हता,अनुभव प्रमाणपत्र व इतर आवश्यक कागदपत्रे अर्जा सोबत uplode करणे अनिवार्य राहिल. अर्ज करण्यासाठी लिंक www.med-edu.in या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. करार तत्वावर तात्पुरत्या नियुक्तीवावतची माहिती संचालनालयाच्या संकेतस्थळावर व यासंस्थेच्या igmc.org या वेबसाईड वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल.

अधिष्ठाता,
इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
नागपुर.

पदांचा तपशिल संवर्ग " सहयोगी प्राध्यापक चिकित्सालयीन विभाग "

| अ.क्र. | विषयाचेनाव | पदसंख्या | शैक्षणिकअर्हता | अनुभव |
|---|---|---|---|---|
| ०१ | अस्थिव्यंगोपचारशास्त्र | ०१ | MD/DNB (Orthopedics) | As per notification 14.02.2022<br>I) Assistant professor in the subject for 4 years in a permitted/Approved /recognize medical Collage /institution<br>II) Shold have atleast four research pubvlications (atleast two as a Associate Professor) (only original papers,meta-analysis,systematic reviews and case series that are publish in journals indexed in medicine,pubmed central citation index,science citation index,expanded Embase,scopus,Directyory of open execess journals(DoAJ) will be considerd)The auther must be am. amongst first three or should be the correspondingauther.<br>III) Should have completed the basics course in biomedical research from institution (s)designated by NMC. |
| एकुण | - | ०१ | - | |

अधिष्ठाता,
इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
नागपुर.

टिप -: सदर जाहीराती मधील नमुद पद संख्येत बदल करणे/सदर जाहिरात पुर्ण पणे रदद करण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीतांनी स्वताकडे राखून ठेवलाआहे.

महत्वाचीटिप -:

१) उमेदवार हा भारताचा नागरी व महाराष्ट्राचा रहिवासी असावा.

२) उमदेवाराचे वय नियुक्ती वेळेस दिनांक 31.08.2024 रोजी कमाल ६९ वर्षापेक्षा जास्त नसावे.

३) प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक यांना करार पध्दतीने नियुक्तीसाठी त्या-त्या पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या अध्यापकांबरोबरच कोणत्याही वयोगटाचे राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने विहित केलेली आवश्यक अर्हता धारण करणारे खाजगी व अन्य क्षेत्रातील उमेदवार (बिगर सेवानिवृत्त) पात्र असतील.

४) मानधन

अ) सेवानिवृत्त अध्यापकांची करार पध्दतीने नियुक्ती झाल्यास त्यांना शासन निर्णय दिनांक १७.१२.२०१६ मधील तदतुदीनुसार दरमहा मानधन अनुज्ञेय राहिले.

| अ.क्र. | पदाचे नाव | विषय | दरमहा मानधन |
|---|---|---|---|
| ०१ | सहयोगी प्राध्यापक | चिकित्सालयीन विषय,इंगांशावैम,नागपूर | १,७०,०००/- |

५) गुणांकन पध्दत -: जाहिराती सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ मध्ये नमुद करण्यात आलेली आहे.

१) परिशिष्ट- अ मध्ये नमुद नुसार अ.क्र.०१ ते०४ वरील एकूण ८५ गुणांच्या आधारे तात्पुरती गुणवता यादी तयार करुन त्यानूसार उमेदवारांना प्रत्यक्ष कागदपत्रे पडताळणी व मुलाखतीस पात्र ठरविण्यात येईल.

२) प्रत्यक्ष कागदपत्र पडताळणी व मुलाखती अंती १०० गुणापैकी किमान ४१ % किंवा त्यापैक्षा जास्त गुण मिळणाऱ्या उमेदवारांचा करार तत्वावर नियुक्तीकरिता विचार करण्यात येईल.

**-: नियम व अटी :-**

१) करार पध्दतीने नियुक्तीचा कालावधी हा नियमित उमेदवार उपलब्ध होईपर्यंत ३६४ दिवसांचा कालावधी यापैकी जे अगोदर घडेल इतका राहील. तथापी सदरहू पदावर नियमित उमेदवार उपलब्ध झाल्यास कंत्राटी उमेदवारांच्या पदस्थापनेत बदल करुन देण्याचे अधिकार मा. आयुक्त,वैद्यकीय शिक्षण व संशोधन,मुंबई यांना राहतील.

२) उमेदवाराचे कामकाज समाधानकारक नसल्यास,गभीर स्वरुपाची अनियमितता व गैरवर्तणूक या कारणासाठी त्यांची नियुक्ती कोणत्याही पुर्वसुचनेशिवाय संपृष्टात येईल.

३) करार पध्दतीने नियुक्ती उमेदवाराने प्रस्थापित मानकांनूसार अध्यापन,रुग्णसेवा व अधिष्ठाता यांनी नेमून दिलेली विवक्षित कामे पार पाडणे आवश्यक राहतील.

४) वरीलप्रमाणे विहित कामकाज पार पाडल्यानंतर महाविद्यालयीन व रुग्णालयीन कर्तव्य व जबाबदाऱ्यांवर विपरीत परिणाम होणार नाही याची दक्षता घेऊन उमेदवारास खाजगी वैद्यकीय व्यवसाय करण्यास मुभा राहिल.

५) करार पध्दतीने नियुक्त उमेदवारांना नियमित नियुक्तीसाठी कोणताही हक्क राहणार नाही, तसेच सदर कालावधी कोणत्याही सेवा प्रयोजनासाठी ग्राहय धरला जाणार नाही.

६) करार पध्दतीने नियुक्त उमेदवारास त्याचा सेवा कालावधीत केवळ नैमत्तीक रजा अनुज्ञेय असतील.

७) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणारे कागदपत्रे/माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहिल.

८) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करता येणार नाही.

९) उमेदवारास नियुक्ती देण्यात आल्यानंतर किमान एक शैक्षणिक सत्र संपेपर्यंत त्यास कोणत्याही परिस्थितीत सेवा सोडता येणार नाही. तशा आशयाचे शपथपत्र उमेदवारास नियुक्तीपुर्वी सादर करणे बंधनकारण असेल. असे शपथपत्र सादर करणाऱ्या उमेदवारास करार पध्दतीने नियुक्ती देण्यात येईल. शैक्षणिक सत्र चालु असलेल्या कालावधीत विद्यार्थीहीत विचारात घेता उमेदवारास राजीनामा कोणत्याही परिस्थितीत स्विकारला जाणार नाही.

१०) बिगर सेवा निवृत्त गटातून करार पध्दतीने नियुक्त होणाऱ्या अध्यापकाची नंतरच्या काळात नियमित नियुक्ती झाल्यास त्याला पुर्वीच्या सेवेचे कोणतेही लाभ अनूज्ञेय असणार नाही.

११) अर्जदाराने संबंधित पदासाठी शरीरीक दृष्टया पात्र असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करावे.

१२) सदर जाहीरातीमधील नमुद पदसंख्येत बदल करणे/सदर जाहिरात पुर्णपणे रदद करण्याचा अधिकार अधिष्ठाता यांनी स्वत:कडे राखून ठेवला आहे.

१३) अर्जदाराने त्यांच्या निवडीसाठी समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्षरित्या कोणत्याही प्रकारचा दबाब आणल्यास त्यास निवड प्रकियेतून बाद करण्यात येईल.

१४) अर्जदाराचे नाव महाराष्ट्र वैद्यकीय मंडळ अधिनियम १९६५ च्या अंतर्गत कायम नोंदणी केल्याबाबतचे प्रमाणपत्र किंवा भारतीय वैद्यकीय परिषदेचे कायम नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

१५) उमेदवारास मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थि रहावे लागेल.(मुलाखतीचे वेळापत्रक वेगळयाने कहविण्यात येईल.)

१६) मुलाखतीला येतांना उमेदवारांनी ऑनलाईन सादर केलेल्या सर्व दस्माऐवजांचे मुळ कागदपत्रे सोबत आणणे बंधनकारक राहील.

अधिष्ठाता,
इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
नागपुर.